# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १८/०२/२०२२

**महासभा क्रमांक :- ०६**

**ठराव क्रमांक :- १५५**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ (क) मधील गंगानगर या विस्तारीत भागामध्ये मेन रोडवर नव्याने विकसीत झालेल्या भागास श्री.गणेश कॉलनी वारणाली गंगानगर रोड असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

ठराव क्रमांक :- १५६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ (क) मधील गंगानगर या विस्तारीत भागामध्ये मेन रोडवर नव्याने विकसीत झालेल्या भागास श्री.कृष्णा कॉलनी वारणाली गंगानगर रोड असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavanshi

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

ठराव क्रमांक :- १५७

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ (क) मधील वॉनलेसवाडी पालवी हॉटेल समोरील स्वामी समर्थ कॉलनी जवळील स.नं.१४/१ या विस्तारीत भागामध्ये नव्याने विकसीत झालेल्या भागास नंदनवन कॉलनी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते. D/ Suryakshmi महापौर,

मा.सभा व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १५८**

**विषय क्रमांक :- १(ज)**

**महाराष्ट्र** महानगरपालिका अधिनियमातील **प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

**कै.एल.आर.भोसले यांनी तत्कालीन मिरज नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून जवळ जवळ १४ वर्ष सामाजिक बांधिलकीने कामकाज केले. त्यापुर्वी देखील त्यांनी नगरसेवक व नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. मिरज शहराचा सर्वांगिण विकासासाठी आणि उन्नतीसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. तत्कालीन मिरज नगरपरिषदेने महापालिका परिसरात त्यांचा पुतळा उभारुन त्यांच्या कार्याची आठवण उजळत ठेवली आहे. दि.०१ जून रोजी त्यांची जयंती असून ती दरवर्षी महापालिकेमार्फत साजरी करणेबाबत नागरिक,सामाजिक संघटना व डॉ.एल.आर.भोसले ट्रस्ट,मिरज यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे. त्यानुसार महापालिकेच्या दिनविशेष कार्यक्रमांतर्गत कै.एल.आर.भोसले यांचा जयंती कार्याक्रमाचा समावेश करणेस ही सभा मान्यता देत आहे.**

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री.शेखजी मोहिते महापौर,

सहाय्यक आयुक्त

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १८/०२/२०२२

**महासभा क्रमांक :- ०६**

**ठराव क्रमांक :- १५९**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.युवराज सतिश बावडेकर_यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१४ मधील आनंद चित्र मंदिर लगत असणारी मुतारी पाडणे अत्यंत आवश्यक आहे. तेथील मुतारी पाडून आनंद चित्रमंदिर समोरील आरवाडे हायस्कूल जवळील सुलभ शौचालयामध्ये ८ सिटर ची मुतारी करणेचे काम प्रस्तावित केले आहे. त्यामुळे बाजार पेठेत येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होणार नाही यासाठी सदर ठिकाणची मुतारी पाडणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Gurjavanshi

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते महापौर,

सह.आयुक्त प्र.क्र.१

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १६०**

**विषय क्रमांक :- १(ज)**

---

**महाराष्ट्र महानगरपालिका** अधिनियमातील **प्रकरण दोन** महानगरपालिकेचे **कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

महानगरपालिकेतील पाणी पुरवठा व घरपट्टी हे दोन स्वतंत्र आस्थापना विभाग असून, या दोन्ही विभागात भागानुसार कामकाज करावे लागत असते. सद्या महापालिकेत अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे दोन्ही विभागात कर आकारणी व वसुली यावर मोठा ताण पडत आहे. हे दोन्ही विभागाचे एकत्रीकरण करणेबाबत प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव तयार करणेत आलेला होता. परंतु त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. सदरची बाब महापालिकेच्या आर्थिक हिताची असल्याने यावर चर्चा होवून निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, महापालिका क्षेत्रामध्ये ज्या नागरिकांच्या पाणी कनेक्शनला मीटर बसविलेले नसेल अशा पाणी ग्राहकाला दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. सैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. शेउजी मोहिते

१) [illegible]

२) पाणी पुरवठा अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :-** १६१

**विषय क्रमांक :-** १(ज)

**महाराष्ट्र** महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे **कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.अप्सरा महेंद्र वायदंडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१९ मध्ये रुक्मीणी मार्केट वालनेसवाडी या ठिकाणी **स्वागत कमान बांधणेत येत आहे. तरी, सदर स्वागत कमानीस आण्णाभाऊ साठे नगर व रुक्मीणी मार्केट वानलेसवाडी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.**

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

Dr Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते.

माननीय महापौर

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

ठराव क्रमांक :- १६२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग चौक ते सिध्दीविनायक होंडा शोरुम पर्यंतच्या रस्त्यास "स्व.डॉ.पतंगराव कदम मार्ग" असे नामकरण करणे आवश्यक आहे. स्व.डॉ.पंतगरावजी कदम हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते होते. महाराष्ट्र राज्याचे वने व पुर्नवसन तसेच १५ वर्षे सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री हे पद भुषविले होते. त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासासाठी मोठे कार्य केलेले आहे. तसेच भारती विद्यापिठाच्या माध्यमातून त्यांनी गोर गरीब होतकरु विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचे महत्वपुर्ण कार्य केले आहे तसेच अणेकांना संस्थेमध्ये नोकऱ्या देऊन बेरोजगारांना नोकरीची संधीही उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांच्या कार्याची आठवण रहावी म्हणून विश्रामबाग चौक ते सिध्दीविनायक होंडा शोरुम पर्यंतच्या रस्त्यास "स्व.डॉ.पतंगराव कदम मार्ग" असे नामकरण करावे अशी शहरातील नागरिकांची, कार्यकर्त्यांची मागणी होत आहे. तरी विश्रामबाग चौक ते सिध्दीविनायक होंडा शोरुम पर्यंतच्या रस्त्यास "स्व.डॉ.पतंगराव कदम मार्ग" असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रोडजी मोहिते. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १६३**

**विषय क्रमांक :- १(ज)**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मयुरेश बाबासो पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सिव्हील हॉस्पीटल चौकास "स्व.डॉ.पतंगराव कदम चौक" असे नामकरण करणे आवश्यक आहे. स्व.डॉ.पंतगरावजी कदम हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते होते. महाराष्ट्र राज्याचे महसुल, उद्योग, वन व पुर्नवसन मंत्री तसेच १५ वर्षे सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री हे पद भुषविले होते. त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासासाठी मोठे कार्य केलेले आहे. तसेच भारती विद्यापिठाच्या माध्यमातून त्यांनी गोर गरीब होतकरु विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचे महत्वपुर्ण कार्य केले आहे तसेच अणेकांना संस्थेमध्ये नोकऱ्या देऊन बेरोजगारांना नोकरीची संधीही उपलब्ध करुन दिलेली आहे.त्यांच्या कर्याची आठवण रहावी म्हणून महानगरपालिका क्षेत्रातील नव्याने विकसित होत असलेल्या सिव्हील हॉस्पीटल चौकास "स्व.डॉ.पतंगराव कदम चौक" असे नामकरण करावी अशी शहरातील नागरिकांची, कार्यकर्त्यांची मागणी होत आहे. तरी सिव्हील हॉस्पीटल चौकास "स्व.डॉ.पतंगराव कदम चौक" असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुदीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते. महापौर,

मा.महासभा व कार्यालय

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १६४**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेची मिरज येथील मनपा उर्दु शाळा क्र.१७ मिरज अल्पसंख्यांक बाहुल्या असलेल्या जवाहर चौक येथे सुरु आहे. या ठिकाणी बालवाडी व इ.१ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण दिले जाते. या शाळेत बालवाडीची २५ मुले व इ.१ ली ते ७ वी ची एकूण १७२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सध्या या शाळेला ८ खोल्यांची आवश्यकता आहे. परंतू, या शाळेत ६ च खोल्या उपलब्ध आहेत. बालवाडीची २५ मुले शाळेच्या व्हरांड्यात बसुन शिक्षण घेत आहेत. व्हरांड्यामध्ये उन, पाऊस, थंडीमध्ये मुलांना शारिरीक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे पालकांची वारंवार तक्रार असते व वेगळ्या वर्गाची व्यवस्था करा अशी पालकांची मागणी होत आहे. या ठिकाणी या शाळेला आणखीन २ खोल्यांची आवश्यकता आहे. म्हणूनच शाळेच्या पूर्व बाजूला असणाऱ्या मनपाच्या इमातीमध्येच रिकाम्या २ खोल्या या शाळेस देणेसाठी प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन लागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D/f. Suryavanshi.

महापौर,

अनुमोदक :- श्री.रोजी मोहिते.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १८/०२/२०२२

ठराव क्रमांक :- १६५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.हरिदास पंडित पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये गुंठेवारी भागातील नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून जुन्या कायद्यान्वये सन २००० पूर्वी व नविन कायद्यान्वये सन २०२० पूर्वी जी बांधकामे गुंठेवारी ले आऊट तयार करुन झालेली आहेत व त्यावर मागील विकासआराखडा व नविन विकास आराखड्यामध्ये आरक्षणे पडली आहेत. ती आरक्षणे गुंठेवारी अधिनियम २००१ च्या कलम ५ (१) (२) मधील तरतूदीनुसार उठविणेबाबत आलेले प्रस्तावानुसार

सांगलीवाडी स.नं.४१/४,४१/५,४१/६ मध्ये सन २००० पूर्वी पासून नागरीवस्ती झाली असून, त्यावर प्रायमरी स्कूल व प्ले ग्राऊंड चे आरक्षण ठेवणेत आले आहे. तरी, महानगरपालिकेची सदर जागा भूमी संपादन कायद्याखाली सर्वती नुकसान भरपाई नागरिकांना देऊन जागा संपादीत करण्याची आर्थिक परिस्थिती नाही व ती बाब शक्यही नाही. तरी, या सर्व बाबींचा व्यापक लोकहितार्थ विचार करुन सदर जागेवरील राहात्या घरांवरील आरक्षण उठवून नागरिकांना गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात यावीत. तसेच महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ मधील सदर आरक्षण उठवून सदर जागेचा रहिवाशी भागामध्ये समावेश करणेसाठी कलम ३७ अन्वये मा.शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सांगलीवाडी स.नं.४१/१ब/१, ४१/२अ/२ब/२क या जागेवरील प्राथमिक शाळा व क्रिडांगणाचे आरक्षण उठविणेबाबत यापूर्वी मा.महासभा क्र.०३ ठराव क्र.२६ दि.०७/०६/२०१८ अन्वये निर्णय झाला असून, सदर ठरावामध्ये महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये योग्य तो फेरफाराचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणेस मान्यता मिळालेली होती. परंतू, सदर ठरावामध्ये गुंठेवारी आरक्षण उठवून प्रमाणपत्रे देणेबाबत महासभेत चर्चा होऊनही ठरावात उल्लेख राहून गेला होता.

सदर ठराव दुरुस्त करुन स.नं.४१/१ब/१, ४१/२अ/२ब/२क या जागेवरील नागरिकांना गुंठेवारी अधिनियमा मधील कलम ५(१) (२) नुसार मा.शासन मान्यतेच्या अटीस अधिन राहून प्रमाणपत्र देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सांगली स.नं.३०२ मधील आरक्षण क्र.१०६ हे महासभा क्र.०७ ठराव क्र.१४१ दि.१९/०१/२०१८ अन्वये स.नं.३०२ मधील नागरिकांना प्रमाणपत्रेही देण्यात आलेली आहेत. परंतू, आरक्षण क्र.१०६ ने स.नं.३०१ मधील ही काही भाग बाधीत होत असून, सदर स.नं.३०१ मधील नागरिकांना महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ मधील सदर आरक्षण उठवून सदर जागेचा रहिवाशी भागामध्ये समावेश करणेसाठी कलम ३७ अन्वये मा.शासन मान्यतेस सादर करणेस ही सभा मान्यता देत असून, मा.शासन मान्यतेच्या अटीस अधिन राहून गुंठेवारी प्रमाणपत्रे देणेस प्रशासनाने कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते.

D.I. Suryavanshi

महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव

मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :-** ०१

**ठराव क्रमांक :-** १६६

**विषय क्रमांक :-** १(ज)

**दिनांक :-** १८/०२/२०२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.प्रकाश शामराव मुळके यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका हद्दीतील सांगली येथील श्री नागराज सांस्कृतिक भवन ट्रस्टचे मंदीर हे सार्वजनिक रस्त्यावर सर्वेक्षणामध्ये आढळून आले. त्यानुसार महापालिका ठराव क्र.१०३ दि.१५/१०/२०१६ नुसार सदरचे मंदीर हे मनपा मालकीच्या खुल्या जागेमध्ये ट्रस्टच्या स्वखर्चाने स्थलांतरीत करणेत आले होते. सदरचे मंदीर हे गेली १०० वर्षा पूर्वीचे असून परिसरातील नागरीकांचे आराध्य दैवत आहे. सदर ट्रस्ट मार्फत तेथे वर्षभर विविध प्रकारच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम, मेळावे, रक्तदान शिबिराचे, कोविड काळामध्ये रुग्णांना मदत, महापूरामध्ये पूरग्रस्त नागरिकांना अन्नदान इ. चे आयोजन करीत असून त्याची देखभाल व दुरुस्ती करणेस महापालिकेच्या नियमानुसार सदरची जागा श्री नागराज सांस्कृतिक भवन ट्रस्ट ई-६४६ (सांगली) यांना देखभाल व दुरुस्ती साठी देणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- सौ.मेनुद्दीन जागीरदार. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.शेडजी मोहिते. महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १६७**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.धीरज चंद्रकांत सुर्यवंशी व सौ.लक्ष्मी रघुनाथ सरगर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

गुंठेवारी नियमितीकरणाचा शासनाने सन २००१ मध्ये कायदा करुन गुंठेवारी वास्तव्य करणाऱ्या गोरगरीब नागरिकांना मोठा दिलासा दिला सदर गुंठेवारी नियमितीकरणासाठी सन २००१ पूर्वी जी घरे अगर बांधकामे झालेली असतील ती सर्व घराचे, इमारती तसेच खुल्या भुखंडाचे सुध्दा नियमितीकरणाबाबत तरतूद करणेत आली आहे. त्यानुसार बऱ्याच गुंठेवारीतील रहिवाश्यांनी गुंठेवारी नियमितीकरणासाठी आपआपल्या क्षेत्राप्रमाणे विकास शुल्क व प्रशमन शुल्कचे डि.डी. काढून महापालिकेत जमा केले त्यानुसार बहुतांशी नागरिकांना नियमितीकरणाचे दाखले ही मिळाले. परंतू प्रशासनाच्या नजरचुकीने असेल किंवा हलगर्जीपणा असेल काही गुंठेवारी प्रस्ताव प्रशमन शुल्क व विकास शुल्कचे डी.डी.सह दाखल करुन सुध्दा प्रदिर्घ कालावधी लोटून सुध्दा त्या प्रस्तावाचे नियमितीकरण झालेले नाही तसेच सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असलेबाबत नोटीस अगर पत्रव्यवहार प्रशासनाकडून करणेत आलेला नाही.

सदर प्रस्ताव दाखल करणाऱ्या रहिवाश्यांनी ज्या-ज्या वेळी ते कार्यालयास संबंधीत अधिकाऱ्याकडे चौकशी केली असता तुमचे नियमितीकरणाचे दाखले लवकरच मिळतील अशी बोलवण केली गेली तसेच काही दिवसानी पूररेषेच्या गोंडस नावाखाली आपले प्रस्ताव मान्यतेस विलंब होत असलेचे कारणे पुढे करु लागलेले आहेत.

खरे पाहता सध्याचा प्रभाग क्र.१२ मधील अनेक नागरिकांनी महापूर येणेपूर्वीच प्रस्ताव दाखल कलेले आहेत तसेच त्याच क्षेत्रातील अनेक रहिवाश्यांनी नियमितीकरणाचे दाखलेही मिळाले आहेत. अगदी घराच्या शेजाऱ्याला दाखला मिळाला असलेची उदाहरणे आहेत. केवळ प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांचे हलगर्जीमुळे अनेक प्रस्ताव नियमितीकरण दाखल्या पासून वंचित राहिले आहे. सदरचे प्रस्तावधारक गोर गरीब, रोज कमवून खाणारे तसेच प्रसंगी घरातील सौभाग्य लेणे, दागदागिणे विकून अगर गहाण ठेवून प्रशमन शुल्क व विकास शुल्क ची रक्कम भरलेली आहे. अशा गोर गरीब नागरिकांवर हा अन्याय आहे.

तसेच नुकताच पारित झालेल्या शासन निर्णयाचा चुकाचा अर्थ काढत शासन निर्णय पारित होणेपूर्वी दाखल झालेल्या प्रस्तावाना सुध्दा तिप्पट प्रशमन शुल्क व विकास शुल्क भरणेबाबत प्रशासनाकडून जबरदस्तीने तत्पर्ता दाखविली जात आहे. विशेष म्हणजे कोणताही शासन निर्णय नियमानुसार महासभे समोर ठेवून त्यावर चर्चा होऊन महासभेने एकमताने अगर बहुमताने घेतलेल्या निर्णयाची चोख अंमलबजावणी करणेचे काम प्रशासनाने करणेचे असते. परंतू प्रशासनाकडून महासभेच्या हक्काची वारंवार पायमल्ली होत असलेचे दिसून येत आहे. सबब नियमानुसार गुंठेवारी प्रस्ताव दाखल केलेल्या प्रस्तावधारकांना न्याय मिळणेसाठी पूररेषा वगैरे तकलादू कारणे न सांगता त्यांचे प्रस्ताव मान्यता देणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.मेहबूब शेख

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते.

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :-** १६८

**विषय क्रमांक :-** १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.निरंजन सुरेश आवटी,विनायक रमेश सिंहासने, सौ.गितांजली सुर्यवंशी (ढोपे पाटील),लक्ष्मण शिवराम नवलाई, सौ.कल्पना कल्लाप्पा कोळेकर, सौ.सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१७ नेमिनाथनगर येथील वाडीकर मंगल कार्यालया शेजारील मनपा मालकीच्या खुल्या जागेमध्ये महिला व बालकल्याण समिती निधीमधून विकसित करणेत आलेले चिल्ड्रन पार्कचे काम लवकरच पूर्णत्वास येत आहे. सदर चिल्ड्रन पार्कला भारताचे माजी पंतप्रधान, प्रसिध्द साहित्यीक, लेखक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी अशा थोर व्यक्तीच्या विचारांची, कार्याची समाजाला कायम प्रेरणा व ज्ञात होणेसाठी परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. तरी नागरीकांच्या मागणीनुसार सदर चिल्ड्रन पार्कला भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १६९**

**विषय क्रमांक :- १(ज)**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने व संजय चंद्रकांत कुलकर्णी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१९ मधील सावरकर कॉलनी येथील सर्वे नं.९४४० मधील मनपा मालकीच्या खुल्या भुखंडाला भारतीय जनसंघाचे संस्थापक सदस्य अंत्योदय तसेच एकात्म मानववाद संकल्पनेचे जनक, महान चिंतक व संघटनकर्ते पंडित दीनदयाल उपाध्याय असे नामकरण करणे आवश्यक आहे. साधी राहणीमान व उच्च विचारसरणी, शास्त्रे, धर्मग्रंथ आणि तात्विक ग्रंथांच्या चिंतनातून व मनातून त्यांनी एकात्ममानवाद हा सिध्दांत मांडला व भारतातील सर्व समाजापुढे ठेवला अशा थोर व्यक्तीच्या विचारांची, कार्याची समाजाला कायम प्रेरणा व ज्ञात होणेसाठी सदर खुल्या भुखंडास त्यांचे नांव देणेबाबत परिसरातील नागरिक वारंवार मागणी करीत आहेत. तरी नागरीकांच्या मागणीनुसार सावरकर कॉलनी येथील सर्वे नं.९४४० मधील खुल्या भुखंडाला पंडित दीनदयाल उपाध्याय असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavash.

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७०**

**विषय क्रमांक :- १(ज)**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१९ मधील कुंभारमळा येथील रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या भागास "गजराज कॉलनी" असे नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. तरी परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार व बाहेरुन येणारे नातेवाईक, पाहुणे मंडळी तसेच पत्रव्यवहार करणेसाठी परिसरातील नागरिकांना सोईचे होणेसाठी सदर विस्तारीत भागातील कुंभारमळा येथील रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या भागास गजराज कॉलनी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Surjavanshi

अनुमोदक :- श्री.रोडजी मोहिते

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७१**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.सविता दादासो मदने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली वॉर्ड क्र.१९ मधील सर्वे क्र.५५/४ वानलेसवाडी येथील भागाला सिध्दनाथ नगर असे नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. या सर्वे नं. मधील लोकांच्या पाणीपट्टी, घरपट्टी बिलावर सिध्दनाथनगर अशी नोंद आहे. तरी याभागाची सिध्दनाथ नगर अशी ओळख निर्माण व्हावी. तरी परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार व बाहेरुन येणारे नातेवाईक, पाहुणे मंडळी तसेच पत्रव्यवहार करणेसाठी परिसरातील नागरिकांना सोईचे होणेसाठी सदर विस्तारीत भागास सिध्दनाथ नगर असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi.

महापौर,

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७२**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते व विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे काही काळ मनपाक्षेत्रामध्ये स्पर्धेचे आयोजन करणेत आलेले नव्हते. तरी प्रार्दुभाव कमी झालेमुळे जनजीवन सुरळीत होत आहे. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महापौर चषक कुस्तीचे आयोजन करणेबाबत मनपा कार्यक्षेत्रातील कुस्ती पटूंची व विविध क्रिडा संघटनांनी तसेच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्र तालीम संघ, सांगली यांनी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे. या अगोदर कोणत्याही स्पर्धेचे आयोजन कुपवाड शहरामध्ये झालेले नव्हते. तरी सदर महापौर चषक कुस्ती स्पर्धेचे कुपवाड येथे आयोजन करणेस व त्याकामी येणारे र.रु.१० लाख पर्यतच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते.

अनुमोदक :- श्री. विष्णू माने.

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavas W.

महापौर,

क्रीडा अधिकारी.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १८/०२/२०२२

**महासभा क्रमांक :- ०६**

**ठराव क्रमांक :- १७३**

**विषय क्रमांक :- १(ज)**

**महाराष्ट्र** महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दि.२०/०१/२०२१ महासभा ठराव क्र.९० मध्ये शहनाज नासिर शेख यांना त्यांच्या वहिलांच्या नावाने (शहनाज शौकत सय्यद) संजय गांधीनगर मिरज येथे घरकुल योजनेंतर्गत घर मिळाले आहे. त्यांच्या ऐवजी सायरा खुदाबक्ष मुलाणी यांची झोपडी इदगाह रस्त्याचे अतिक्रमण काढताना काढली गेली आहे त्यांना देणेत यावी व शहनाज नासिर शेख यांच्या नावे देण्यात आलेले ठरावातील नाव रद्द करणेकामी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मनगू सरगर.

महापौर,

नगरसचिव (SMMC)

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपा...

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७४**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्रीमती कांचन युवराज कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ या कायद्याला महाराष्ट्र शासनाने मान्यता देऊन सदर अधिनियमातील कलम ३ च्या पोटकलम (३) च्या परंतुकान्वये प्रशमन शुल्क व विकास शुल्काबाबतचे शासन नगरविकास विभागाचे आदेश अनबा/१०२०/४८०/प्र.क्र.७९/भाग-२/ १८ मे २००१ ने पारित करणेत आले होते.

महासभेमध्ये सदर आदेशावर चर्चा होऊन प्रशमन शुल्क चर्चा होऊन प्रशमन शुल्क व विकास शुल्क आकारणी बाबत चे दराला मान्यता देणेत येवून महासभेने मंजूरी दिलेल्या दरानुसारच प्रशमन शुल्क व विकास शुल्क भरुन घेऊन नियमितीकरण करणेबाबतचा निर्णय एकमताने घेणेत आला व त्यानुसारच आज अखेर गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव दाखल झाले व त्यांचे काही प्रस्तावांचे नियमितीकरण सुध्दा झाले आहे. अशाच प्रकारे अनेक प्रस्ताव दाखल झाले परंतू प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यावर तसेच कोरोना सारख्या महामारीमुळे दाखल प्रस्तावाचे नियमितीकरणाचे प्रमाणपत्रे देता आले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे प्रस्ताव निकाली निघाले नाहीत तरी प्रस्ताव दाखल करणाऱ्या प्रस्तावधारकावर अन्याय झाला आहे हे ही नाकारता येत नाही.परंतू शासन आदेश क्र.गुंठेवा/१०२१/प्र.क्र.४८/२०२१/नवि ३० दि.१८/१०/२०२१ हा प्रशमन शुल्क व विकास शुल्क सुधारीत दराने आकारणे बाबत निर्देश दिलेले आहेत. सदरच्या निर्देशावर महासभेत चर्चा होऊन महासभेने एकमताने अगर बहुमताने प्रशमन शुल्क व विकास शुल्काचे दरास मान्यता दिलेली असेल त्यानुसार जमा करणे क्रम प्राप्त होते. प्रशासनाने सदर आदेशाचा अर्थ आपले सोयीनुसार लावून तसेच महासभेची पूर्व मान्यता न घेताच जबरदस्तीने तिप्पट रक्कमेची वसुली सुरु केली आहे.परंतू प्रशासनाच्या आडमुठे व मनमानी कारभारामुळे या कामात खीळ पडत आहे. व नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झालेली आहे. याबाबत वेळीच योग्य तो निर्णय घेणे लोकप्रतिनिधी या नात्याने आपले कर्तव्य असलेने प्रशासनाकडून महासभेची पूर्व मान्यता न घेता प्रशमन शुल्क व विकास शुल्काची जुन्या प्रस्तावांची वसूली तात्काळ थांबवून महासभेच्या मान्यतेने ठरविलेल्या दरानेच वसुली करणेबाबत तसेच दि.१८/१०/२०२१ चे शासन आदेशापूर्वी जे प्रस्ताव दाखल आहेत. व ज्यांनी प्रशमन शुल्क व विकास शुल्कचे ५०% व १००% रक्कम जमा केलेले आहेत त्यांना पूर्वीचे दरानुसारच मान्यता देणेसाठी आलेल्या प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

स.ज.र

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७५**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या मालकीच्या सि.स.नं.८६/२ योगीनगर मिरज येथे नव्याने महापालिकेची लायब्ररी इमारत होत असून, सदरची इमारत मे २०२२ पर्यत बांधून पूर्ण होईल. सदर इमारत मोठी असून, या इमारतीमध्ये लायब्ररी विभाग सोडून इतर बऱ्याच खोल्या तयार होणार आहेत. या लायब्ररी इमारतीच्या लायब्ररी विभाग सोडून इतर खोल्यामध्ये एखादी शाळा सुरु करता येईल. तरी सि.स.नं.८६/२ या जागेवर होत असलेल्या लायब्ररी इमारतीमध्ये शिल्लक राहणाऱ्या खोल्यामध्ये या भागातील मुलांसाठी महापालिकेच्या पटसंख्ये अभावी बंद पडलेल्या शाळा नं.२,३,७,२४ या शाळापैकी एक शाळा सुरु केल्यास त्या भागातील मुले त्यांच्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कापासून वंचित राहणार नाही व त्यांची शिक्षणाची जवळ व मोफत सोय होणार असलेने, नविन होणाऱ्या लायब्ररी इमारतीच्या शिल्लक खोल्यामध्ये शाळा सुरु करण्यास मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावानुसार उपरोक्त बंद पडलेल्या शाळांपैकी गुरुवार पेठ,मिरज येथील शाळा नं.७ ही सि.स.नं.८६/२ या जागेवर होत असलेल्या लायब्ररी इमारतीमध्ये शिल्लक राहणाऱ्या खोल्यामध्ये स्टाफसह स्थलांतरीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.योगेंद्र भगवान थोरात ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Surwase

अनुमोदक :- श्री.मेहबुबीन बागवान महापौर,

प्रशासन अधिकारी
शिक्षण विभाग

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७६**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.शुभांगी महेश साळुंखे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

वेरळा विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.अरुण दत्ताजीराव चव्हाण यांना या संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी विकास कामे केली आहेत. त्यांच्या कामाची आठवण रहावी याकरीता नगरभूमापन क्र.३२६५ चिंतामणी नगर, कलानगर,मानधवनगर रोड,सांगली या महापालिकेच्या मालकीच्या भूखंडास वेरळा विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.अरुण दत्ताजीराव चव्हाण उद्यान असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते. D.P.Suryavanshi महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७७**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

खराडे पाटील ट्रेनिंग इन्स्टिटयुट,सांगली या संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योगकर्ता विभाग मुंबई महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय- ३ महापालिका मार्ग मुंबई दि.२९/०८/२०१९ च्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सदर संस्थेने सांगली वॉर्ड क्र.१० मधील महानगरपालिकेच्या मालकीच्या समाज मंदिरामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण वर्ग सुरु करणेसाठी महानगरपालिकेकडे अर्ज केलेला आहे. सदर संस्थेस या समाज मंदिरामध्ये वर्ग सुरु करणेस ५ वर्ष कालावधीसाठी परवानगी मिळालेस येथील युवक व युवतींना मोठया प्रमाणात लाभ होणार आहे. या संस्थेने या इमारतीची देखभाल दुरुस्तीची व स्वच्छतेची हमी दिलेली आहे. या समाज मंदिरामध्ये दोन खोल्या प्रशिक्षण वर्गासाठी देणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavnshi

अनुमोदक :- श्री.रोडजी मोहिते. महापौर,

मा.सभा व्यवस्थापक

महा... सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १५८**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.आरती रविंद्र वळवडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

राज्यातील महानगरपालिका मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी, स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत शासन निर्णय क्र.स्वमक्ष-२०१७/प्र.क्र.१२६/नवि.१४ दि.११ जुलै २०१९ तसेच दि.०१ जुलै २०१९ च्या अधिसूचना उपविधी लागू करण्यासाठी महानगरपालिकेची (महासभेची) स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यकता नाही तसचे सदर उपविधी ची अंमलबजावणी करणेची जबाबदारी महानगरपालिका मा.आयुक्तांची असेल याचा आयुक्तांनी चुकीचा व सोयीस्कर अर्थ काढून ज्या उपविधीची अंमलबजावणी आयुक्तांनी करणे बंधनकारक आहे. त्याकडे जाणीवपुर्वक डोळेझाक करुन जे उपयोगकर्ता शुल्कबाबतचे संपूर्ण अधिकार महानगरपालिकेचेच असलेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील तरतुदीनुसार नियम ३ पोटनियम ९५ मध्ये (उपयोगकर्ता शुल्क म्हणजे घनकचरा संकलन,वाहतुक, प्रक्रिया व विल्हेवाट लावण्याची सेवा देण्याचा खर्च पुर्णता अथवा अंशता वसुल करणेचे करण्यापोटी कचरा जनकावर नियम २ मध्ये नमुद स्थानिक संस्था अन्य अस्तित्वाने निर्धारित केलेले शुल्क) हे अधिकार महानगरपालिका (महासभा) चे असलेचे स्पष्ट नमुद असून नियम ६ पोटनियम २१ मध्ये (उपयोग कर्ता शुल्क – कचरा व्यवस्थापन सेवा दिल्यापोटी अनुसूची मध्ये व वेळोवेळी नमुद दराने नागरी स्थानिक संस्था घरगुती/आवारांकडून उपयोगकर्ता शुल्क वसुल करु शकतील. सदर उद्दिष्टांप्रीत्यर्थ नागरी स्थानिक महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये प्रत्येक घरातून/आवारातून कचरा संकलीत करण्यासाठी कर्मचारी /पदनिर्देशित व्यक्ती नेमून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ चे अनुपालन करतील. स्थानिक स्वराज्य संस्था उपयोगकर्ता शुल्क वसुल करु शकेल.) असे स्पष्ट नमुद केलेले आहे.त्यामुळे उपयोगकर्ता शुल्क वसुली महानगरपालिकेची ऐच्छिक बाब असलेचे स्पष्ट होते. परंतु, आयुक्तांनी मात्र ज्या उनपविधीची अंमलबजावणी करणे बंधनकारक त्या उपविधीची अंमलबजावणी आजअखेर केलेली नाही. उलट जे उपयोग कर्ता शुल्क वसुलीही ऐच्छिक तसेच ती पुर्णता करायची कि अंशता करायची यांचे संपूर्ण अधिकार महासभेस असताना महासभेच्या पूर्व मान्यतेशिवाय महापालिका त्या भागातील नागरिकांवर हा कर जबरदस्तीने लादलेला आहे. वसुल केला जात आहे.

सदरची बाब ही महासभेच्या अधिकाराची पायमल्ली करणारी बेकायदेशीर असून, व्यापक लोकहिता विरोधी असलेने सदरची वसुली तात्काळ थांबविणेत आली पाहिजे सदरचा शासन निर्णय पारित होणे पुर्वीच्या महापालिकेकडून सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात लेखाशिर्ष R०००४ स्तर साफ-सफाई लाभकर वसुल केला जात आहे. तसेच मार्च अखेर स्थायी समितीने रु.६,८८,२५,७२७/- कोटी (६ कोटी ८८ लाख २५ हजार ७२७) जमा होण्याचा अंदाज व्यक्त केला. तर महासभेने रु.७,५३,६४,२००/- (७ कोटी ५३ लाख ६४ हजार २००) जमा होणेचे संकेत दिलेले आहेत. तसेच, लेखाशिर्ष R००१० स्वच्छता उपयोगकर्ता कर शुल्क रु.१२,८०,४०,५००/- (१२ कोटी ८० लाख ४० हजार ५००) जमा होणेचे संकेत दिलेले आहेत.

मुळात घनकचरा व्यवस्थापन ही योजनाच रु.६० कोटीची असून, त्यासाठी केंद्र व राज्यशासन कडून ३५ कोटी प्राप्त होणार असून मनपा हिस्सा फक्त २५ कोटीचा असून, सदरचा खर्च सुद्धा हरित न्यायालयाचे आदेशानुसार एस्क्रो अकौन्ट मधील रु.५५,०९,४८,१६५.९७ (५५ कोटी ९ लाख ४८ हजार १६५.९७) ची रक्कम बँक अकौंन्ट मध्ये शिल्लक आहे त्यातून खर्च करावयाची आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,पूणे यांनी र.रु.६० लाख घेवून दिलेल्या मान्यतेतील तांत्रिक मान्यता मुद्दा क्र.१५ नुसार सदर योजनेच्या देखभालीसाठी प्रतिवर्षी ५ कोटी ९२ लाख इतका खर्च अपेक्षित असून सदर योजनेपासून मिळणारे उत्पन्न सुमारे ६ कोटी ५७ लाख अपेक्षित असलेने सदर योजनेच्या देखभाली खर्चाचा बोझा महापालिकेवर न पडता वर्षाला सुमारे ६० लाखाचे उत्पन्नच मिळणार असलेने मा.आयुक्तांनी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी ही योजना तात्काळ सुरु करणेकामी युद्ध पातळीवर नियमानुसार प्रयत्न करणे गरजेचे व आवश्यक आहे. त्यामुळे सद्या जो उपयोगकर्ता शुल्कच्या गोंडस नावाखाली वसुल करणेत येत असलेला कर मा.आयुक्तांनी वसुल करणे बंद करावे याबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान.

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavshi

अनुमोदक :- श्री. बोडजी मोहिते.

महापौर,

वै.आ.अ.

महापालिका सचिव

ली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०६** दिनांक :- १८/०२/२०२२

**ठराव क्रमांक :- १७९**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.वर्षा अमर निंबाळकर, श्री.मनोज रघुनाथ सरगर व अजिंक्य दिनकर पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री. ऋतुराज यादव हे अनुकंपा तत्वावर सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये प्रभारी कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री. यादव हे जेव्हा अनुकंपा तत्वावर महानगरपालिकेच्या सेवेमध्ये रुजू झाले तेव्हा ते डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत होते त्यामुळे त्यांच्याकडे गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र त्यावेळी उपलब्ध नव्हते. सदरची बाब त्यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणली होती परंतु, महानगरपालिकेने त्यांना त्यांच्या उपलब्ध असलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त असलेल्या कुली या पदावर रुजू करुन घेतले. सद्यस्थितीत त्यांच्याकडे जून २०१९ पासून कनिष्ठ अभियंता या पदाचा कार्यभार सोपविलेला आहे. सद्यस्थितीत श्री.यादव यांचे डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण झाले असून त्याची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात आली आहे. श्री.यादव हे त्यांच्याकडे सोपविण्यात आलेला कार्यभार व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत, त्यामुळे त्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देणेकामी मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे जून २००४ पासून मेस्त्री या पदावर नियुक्त झालेले अमीरहमजा नुरमहंमद मुलाणी यांची नियुक्ती करणेत आलेली होती. श्री.मुलाणी यांची शैक्षणिक पात्रता बी.ई.सिव्हील असून, त्यांचेकडे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाचा अतिरिक्त कार्यभार गेल्या ११ वर्षापासून देण्यात आलेला असून ते गेली १ वर्षापासून प्रभारी शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग या पदाचे काम पहात आहेत. श्री.मुलाणी यांची सुमारे १८ वर्षाची सेवा पाणी पुरवठा विभागात प्रभारी अभियंता म्हणून झाली असल्याने, त्यांनी प्रामाणिकपणे केलेल्या सेवेचा व त्यांचे शैक्षणिक पात्रतेचा विचार करता, ते शाखा अभियंता पदावर पदोन्नतीस पात्र ठरत असल्याने, श्री.मुलाणी यांना शाखा अभियंता पदी पदोन्नती देणेकामी मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.तोफिक हारुण शिकलगार यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.२ कडील शाखा अभियंता, श्री.महेश महादेव मदने हे अनुकंपा तत्वावर रुजू झाले होते. तेंव्हा त्यांचे शिक्षण बी.टेक सिव्हील इंजिनियरींग पूर्ण झाले होते. परंतु गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे त्यांच्या उपलब्ध शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त असलेल्या कार्यशाळा विभागाकडील मेकॅनिकल मेस्त्री या पदावर रुजू करुन घेतले होते. सद्या दि.२३/०३/२०२१ पासून प्रभाग समिती क्र.२ कडील शाखा अभियंता या पदाचा कार्यभार दिलेला आहे. श्री.मदने यांची शैक्षणिक पात्रता बी.टेक सिव्हील इंजिनियरींग हे शिक्षण पूर्ण झाले असून त्याची नोंद सेवा पुस्तकामध्ये घेण्यात आली असून, शैक्षणिक पात्रतेनुसार शाखा अभियंता या पदावर पदोन्नती देणेसाठी मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, श्री.विनायक चंद्रकांत जाधव हे माहे मार्च २००३ पासून महापालिका सेवेत आहेत. पाणी पुरवठा विभागाकडे फोरमन या पदावर काम करीत असून, मागील दोन वर्षापासून त्यांच्याकडे प्रभारी मेकॅनिकल इंजिनियर या पदावर पाणी पुरवठा विभाग मिरज, जलनि:सारण विभाग मिरज व कार्यशाळा विभाग मिरज या पदाचा अतिरिक्त कार्यभार देणेत आलेला आहे. श्री.जाधव यांची शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनियरींग अशी असल्याने, त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार मेकॅनिकल इंजिनिअर या पदावर पदोन्नती देणेस तसेच, श्री.तेजस संजीव शहा हे महानगरपालिकेमध्ये माहे ऑगस्ट २००५ पासून आरोग्य विभागाकडे क.लिपिक या पदावर तद्नंतर माहे नोव्हेंबर २००८ सालापासून जलनि:सारण विभागाकडे तांत्रिक सहाय्यक म्हणून रुजू आहेत. सद्या जलनि:सारण विभाग,सांगली क.अभियंता या पदाचा व मागील एक वर्षापासून प्रभारी कनिष्ठ अभियंता (यंत्र) कार्यशाळा विभाग,सांगली या पदाचा कार्यभार सांभाळत असल्याने, त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार कनिष्ठ अभियंता (यंत्र) या पदावर पदोन्नती देणेसाठी मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

मा.अभि.(आस्था)

सूचक :- श्री. अतहर नाथकवडी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. तोफिक शिकलगार,

D.P. Surjavanshi
महापौर,